वाचा : १) गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील पत्र क्रमांक पंसई/आ-२ /१५७/१५
इगतपुरी दिनांक ०२.०२.२०१५
२) या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक शिक्षण/प्राथ-९/ ७५ /२०१६ दिनांक २३.०२.२०१६
३) या कार्यालयाचे आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/१०४/२०१७ दिनांक ०१.०२.२०१७
४) सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक विभाग नाशिक यांचा चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/सी.आर. ४०/२०१७ दिनांक २० मार्च २०१८
५) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटिस क्र.शिक्षण/प्राथ९/१०२३/१८ दिनांक १०.८.२०१८
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे कडील मजुर टिपणी दिनांक १९ /१० /२०१८

## आदेश

नाशिक जिल्हा परिषद,नाशिक
शिक्षण विभाग (प्राथमिक )
जा.क्र/शिक्षण/प्राथ-०९/ १२३१ /२०१८
नाशिक दिनांक १९ /१० /२०१८

ज्याअर्थी श्री.मनोज रघुनाथ निकम हे प्राथमिक शिक्षक म्हणुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळेगावं ता.इगतपुरी येथे कामकाज करत असतांना, दिनांक १७.०८.१९९९ ते दिनांक १३.०९.२०१५ या कालावधीत एकुण १० वर्षे ०९ महिने कामावर कोणत्याही प्रकारची पुर्वपरवानगी न घेता अनाधिकृतपणे गैरहजर राहुन कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे ,वरिल कालावधीत कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहुन शालेय विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान करुन, त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) १९६७ चे कलम ३ चा भंग केलेला आहे. यास्तव त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९६४ चे कलमान्वये दोपारोपाची कार्यवाही करणे आवश्यक होते.

ज्याअर्थी श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द खाते चौकशी करणे कामी संदर्भ क्रमांक ०२ अन्वये दोपारोप पत्रासह ज्ञापन गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती इगतपुरी यांचे मार्फत बजाविण्यात कामी पाठविण्यात आले होते. प्रस्तुत ज्ञापन श्री.मनोज रघुनाथ निकम प्रा.शि. यांनी दिनांक १३.१२.२०१६ रोजी स्विकारले आहे. सदर ज्ञापनास श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांनी खुलासा सादर केलेला नसल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये त्यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

ज्याअर्थी सहाय्यक आयुक्त (चौकशी ) नाशिक यांनी संदर्भ क्रमांक ४ अन्वये खाते निहाय चौकशी पुर्ण करुन श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांचेवर ठेवण्यात आलेले दोन आरोपापैकी, दोनही आरोप सिध्द होत असले बावतचा चौकशी अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार आरोपाचे गांभीर्य विचारात घेता आपण महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग केला आहे.

ज्याअर्थी श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ कलम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ का करण्यात येवु नये ? यावावत या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटिस क्रशिक्षण/प्राथ९/१०२३/१८ दिनांक १०.०८.२०१८ ही गटशिक्षणाधिकारी पं.स.सिन्नर यांचे मार्फत बजाविण्यात आलेली असून प्रस्तुत नोटीस दिनांक १२.०९.२०१८ रोजी स्विकारली आहे. श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांनी अंतिम कारणे दाखवा नोटिसेस दिनांक०१.१०.२०१८ रोजी गटशिक्षणाधिकारी पं.स.सिन्नर यांचे मार्फत खुलासा सादर केला असुन खुलासा समवेत कोणत्याही प्रकारचे बचावाचे कागदपत्रे वा दस्ताऐवज सादर केलेले नाही. प्रस्तुत केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक यांना सदर खातेचौकशी अंती महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलम ४(७) नुसार जिल्हा परिषद सेवेतुन बडतर्फ करण्यात येत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जुनवनेवस्ती ता.सिन्नर यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति :- श्री.मनोज रघुनाथ निकम प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जुनवनेवस्ती ता.सिन्नर
द्वारा :- गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती, सिन्नर
प्रत :- गटविकास अधिकारी (उ.श्रेणी) पंचायत समिती, सिन्नर यांना उचित कार्यवाहीसाठी
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पचांयत समिती, सिन्नर यांना उचित कार्यवाहीसाठी
२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडल्या असून,त्यापैकी आदेशाची मुळप्रत संबंधितास बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत या कार्यालयास सादर करावी.

Scanned by CamScanner